दिनांक 21/08/2023 रोजीचा प्रशासकीय ठराव क्र.63

विषय :- विटा शहरातील भटक्या कुत्र्यांचे Dog Control Programme चे नियोजन करणे, व्यवस्थापन करणे, भटक्या कुत्र्यांना पकडणे, वाहतूक करणे, नसबंदी शस्त्रक्रिया करणे, लसीकरण करणे व औषधोपचार करून कुत्र्यांना सोडून देणे तसेच तद्अनुषंगिक कामे करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी आरोग्य निरीक्षक यांची दिनांक 17/08/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषद क्षेत्रामध्ये भटक्या कुत्र्यांची संख्या खूप वाढली असून शहरातील नागरिकांना व लहान मुलांना ही भटकी कुत्री चावनेचे प्रकार घडत आहेत. भटकी कुत्रे शहरामध्ये फिरत असल्याने रस्त्यावरील मार्गक्रमण करणारे लहान मुले, महिला, वृध्द नागरीक, विद्यार्थी, नागरीक यांचेवर हल्ला करीत आहेत. तसेच रहदारी करणा-या दुचाकी वाहन धारकांना अडथळा निर्माण होत असून वारंवार मोठ्या प्रमाणात वाहनांचे अपघात होत आहेत. भटक्या कुत्र्यांच्या विष्ठेमुळे दुर्गंधी पसरून ठिकठिकाणी अस्वच्छतादेखील होत आहे. त्याचा नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत आहे. अशा नगरपरिषदेमध्ये नागरीकांच्या तक्रारी दाखल झालेल्या आहेत. भटक्या कुत्र्यांची संख्या कमी करावयाची असलेस The Animal Birth Control (Dogs) Rules 2001 मधिल 3 (3) अन्वये विटा शहरातील भटक्या कुत्र्यांचे Dog Control Programme चे नियोजन करणे, व्यवस्थापन करणे, भटक्या कुत्र्यांना पकडणे, वाहतूक करणे, नसबंदी शस्त्रक्रिया करणे, लसीकरण करणे व औषधोपचार करून कुत्र्यांना सोडून देणे तसेच तद्अनुषंगिक कामे करणे आवश्यक आहे. जेणेकरून त्यांची शहरात उत्पत्ती वाढणार नाही व भटक्या कुत्र्यांची संख्या कमी होईल.

शहरातील भटक्या कुत्र्यांची नसबंदी शस्त्रक्रिया करणेसाठी पशुवैदयकिय विभाग विटा नगरपरिषदेकडे उपलब्ध नाही. त्यामुळे भटक्या कुत्र्यांची नसबंदी शस्त्रक्रिया करणेसाठी रितसर निविदा मागवून कुत्र्यांची नसबंदी शस्त्रक्रिया करणे आवश्यक असलेने सदरचे कामाची निविदा काढून भटक्या कुत्र्याची नसबंदी शस्त्रक्रिया करणेसाठी एजन्सी नियुक्त करणेस, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन आदेश क्रमांक एमसीआरे/2020/प्रक्र71/नवि- 14 दिनांक 24/12/2021 तसेच महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औदयोगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 316(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सदरचे काम करणेस व यासाठी येणारा खर्च नगरपरिषद निधीतून करणे आवश्यक आहे. सन 2023-24 च्या वार्षिक अंदाजपत्रकामध्ये या कामासाठी र.रू.5.00 लक्ष इतकी तरतूद करणेत आली आहे.

पान नं.2 वर

तरी विटा शहरातील भटक्या कुञ्यांचे Dog Control Programme चे नियोजन करणे, व्यवस्थापन करणे, भटक्या कुञ्यांना पकडणे, वाहतूक करणे, नसबंदी शस्त्रक्रिया करणे, लसीकरण करणे व औषधोपचार करून कुञ्यांना सोडून देणे तसेच तद्अनुषंगिक कामे करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ. विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 21/08/2023 रोजीचा प्रशासकीय ठराव क्र.64

विषय :- नगरपरिषद मालकीचे आळसंद जलशुध्दीकरण केंद्र येथे विदयुत विभागाकडील नविन 300 एच.पी. मोटर्स सुरू करणेसाठी आवश्यक साहित्य खरेदी करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी इंजिनियर यांची दिनांक 11/08/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

नगरपरिषद मालकीचे आळसंद जलशुध्दीकरण केंद्र येथील नवीन 300 एच.पी. मोटर्स सुरू करणे कामी खालील मटेरियल वापरून कामे करून घेणेची आहेत.
1)11 केव्ही 3 सी 300 स्क्वे मौ.मी. राऊंड अमोर्ड एच.टी. एक्स. एच.पी.ई. केबल -50 मी.2)11 केव्ही 3 सी 300 स्क्वे मी.मी. इंडोर टर्मिनेशन ---2 3) 11 केव्ही 3 सी 300 स्क्वे मी.मी. आऊटडोर टर्मिनेशन-2 4) कॉपर स्ट्रीप 25x3 5) आर्थिंग पावडर बेंग-80 किलो----40 किलो 6) बॅटरी सप्लाय आथिंग पट्टी 7) जी. आय. आथिंग करणे.8) बार्ध वायर 20 किलो 9) डेंजर बोर्ड 3 नग 10) 70 वम्न लग 11) 300 एम एम केबल जी आय, पाईप 8 फुटी 12) खोबळा क्लैम्प 13) 9 इंची नट बोल्ट 14) 6 इंची नट बोल्ट 15) ट्रान्सपोर्टींग 16) इनकमिंग केवल 300 एमएम व ट्रान्सफार्मर जॉईन किट

वरीलप्रमाणे काम करून घेणे अत्यावश्यक आहे. याकामी सन 2023-2024 या वार्षिक अंदाजपत्रकामध्ये रु.15.00 लक्ष तरतूद करणेत आलेली आहे. तरी वरील सर्व कामे करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ. विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 21/08/2023 रोजीचा प्रशासकीय ठराव क्र.65

विषय :- घोगाव जॅकवेल येथील 300 HP मोटर्सचे स्टार्टर, पॅनेल बोर्ड इ. ठेवणेकरिता आर.सी.सी. रूमचे बांधकाम करणेचे कामास मुदतवाढ मिळणेबाबत मक्तेदार श्री.सौरभ पी. पवार यांचे दाखल दिनांक 01/08/2023 रोजीचे अर्जावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी इंजिनियर यांची दिनांक 10/08/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

घोगाव जॅकवेल येथील 300 HP मोटर्सचे स्टार्टर, पॅनेल बोर्ड इ. ठेवणेकरिता आर.सी.सी. रूमचे बांधकाम करणेचे कामास मुदतवाढ मिळणेबाबत मक्तेदार सौरभ पी. पवार यांनी 01 ऑगस्ट 2023 रोजी नगरपरिषदेकडे विनंती अर्ज दिलेला आहे. सदर कामाची मुदतवाढ 180 दिवस इतकी होती. कामाची वर्क ऑर्डर 09/12/2022 रोजी देणेत आलेली होती. कामाची मुदत 07/06/2023 रोजी संपलेली आहे. सदरचे काम हे जागेच्या वादामुळे सुरू करता आले नाही. तसेच जागा वाद मिटलेनंतर कामास सुरूवात केलेली होती. परंतू पाऊसाळा लागला त्यामुळे चिखलात सामान नेणे फार अवघड होते. त्यामुळे मुदतीत काम पुर्ण होऊ शकले नाही. तरी मक्तेदार सौरभ पी.पवार यांना पुढील 6 महिने म्हणजे दि.07/12/2023 पर्यंत मुदतवाढ देणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ. विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 21/08/2023 रोजीचा प्रशासकीय ठराव क्र. 66

विषय :- नगरपरिषद मालकीचे घोगांव जॅकवेल येथील नवीन स्वीच रूम बांधणेसाठी जागा खुली करणे त्या जागेतील ट्रान्सफार्मर, लोखंडी पोल शिफ्ट करणे व तदअनुषंगिक कामे करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी इंजिनियर यांची दिनांक 11/08/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषदेचे शहरास पिण्यास पाणी पुरवठा करणारे जॅकवेल घोगाव येथील कृष्णा नदीच्या काठावर असून तेथील ट्रान्सफार्मरच्या कट्टयाची उंची कमी असलेमुळे नदीस येणा-या महापूरामुळे सर्व यंत्रणा पाण्याखाली जात होती. व शहराच्या पाणी पुरवठ्यावर गंभीर परिणाम होत होता हे टाळणेसाठी सदर ठिकाणी त्याच जागेत पुर्वीचे सर्व साहित्य काढून ट्रान्सफार्मर शिफ्ट करून तदअनुषंगिक कामे करून सदर ठिकाणी पर्यायी जागा नसलेने सदर जागा खुली करून तेथेच नवीन स्वीच रूम व ट्रान्सफार्मरचे कट्याची उंची पूरनियंत्रण रेषेच्यावर बांधवी लागणार आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे कामे करून घेणे आवश्यक आहे. 1) 800 के. व्ही. ट्रान्सफार्मर शिफ्ट करणे. 2) ट्रान्सफार्मर कर्मचारी रुमच्या वरती फिटींग करणे कामी लोखंडी पोलच्या सहाय्याने स्टॅण्ड तयार करणे.3) सध्याच्या जागेवरील असलेली विविध लोखंडी पोल काढणे. 4) ट्रान्सफार्मर शिफ्ट केलेनंतर त्यास नवीन वीज कनेक्शन करते वेळी लागणारे इलेक्ट्रीक साहीत्य पुरवठा करणे. 5) नवीन ए.बी. स्वीच बसविणे

याकामी सन 2023-2024 या वार्षिक अंदाजपत्रकामध्ये रु.15.00 लक्ष तरतूद धरणेत आलेली आहे. तरी घोगांव जॅकवेल येथील नवीन स्वीच रूम बांधणेसाठी जागा खुली करणे त्या जागेतील ट्रान्सफार्मर, लोखंडी पोल शिफ्ट करणे व तदअनुषंगिक कामे करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ. विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा